Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S


# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**
**November -2018**

**SPECIAL ISSUE-LXXIII,( A)**

# Samiksha






**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November -2018

SPECIAL ISSUE - LXXIII,( A)

# Samiksha

## समीक्षा

**Executive Editor:**
Prof.Virag S.Gawande
**Guest Editor :**
Dr.Sanjay j. Kothari
Dr. Dinesh W. Nichit
Dr. Shubhangi Dange
**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar,

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 225/-



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
November 2018

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom** of **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Dr. Sharad Birhade** - D. N. College, Faizpur.
- **Prof. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul.
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

**Review Committee -**

- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. K. Wadekar** – M. S. G.College, Malegaon Camp, Dist- Nashik

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

**Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258**

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
November 2018

## INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महानुभवांचे लीळाचरित्र व अन्य चरित्रग्रंथ | प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 5 |
| 2 | अमरावती जिले में वर्षा विचलन का प्रमुख फसलों के वितरण पर प्रभाव – एक भौगोलिक अध्ययन | प्रा. पराग श्री. मेश्राम | 9 |
| 3 | वनौषधी सफेद मुसळीचे आर्थीक अध्ययन | प्रा.डॉ. संतोष एन ताडे | 14 |
| 4 | आसनांचा खेळाडूंच्या पायाच्या कार्यक्षमतेवर होणाऱ्या परिणामांचे चिकित्सक अध्ययन | प्रा. डॉ. सुभाष शेकोकर / नानासाहेब सपकाळ | 17 |
| 5 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्रिविषयक दृष्टीकोन | कु. स्वाती वि. डवरे | 20 |
| 6 | महात्मा गांधीजीचे ग्रामीण विकासाबाबत विचार | प्रा. सुजाता केने | 22 |
| 7 | महिला सक्षमीकरणामध्ये शासनाची भूमिका | प्रा. डॉ. वंदना फटाले | 24 |
| 8 | शारीरीक शिक्षण आणि मानवी आरोग्य सुदृढता एक चिकीत्सक अध्ययन | प्रा. आशिष गोंविदराव बरडे | 28 |
| 9 | स्त्रीवाद एक चिंतन | डॉ.वंदना पळसापुरे | 33 |
| 10 | ब्रिटीशकालीन मराठी वृत्तपत्रांचे कार्य | डॉ. प्रमोद ना. घ्यार | 37 |
| 11 | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणांचा विचार | प्रा.डॉ. राजकुमार रघुनाथ मुसणे | 42 |
| 12 | किशोरावस्थेतील ताणतणाव आणि समायोजन | डॉ. प्रा. अमिता बन्नोरे | 47 |
| 13 | पश्चिम विदर्भातील एकुण ग्रामीण लोकसंख्येच्या घनतेचा भौगोलीक अभ्यास | प्रा. डॉ. राहुल इंगळे | 50 |
| 14 | चांदूर रेल्वे शहरातील ध्वनी प्रदूषणाचा क्षेत्रीय अभ्यास | प्रा. संजीव वि. भुयार | 55 |
| 15 | छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण | प्रा.डॉ. कैलाश फुलमाळी | 60 |
| 16 | भारतातील लोकशाही विकेंद्रिकरण आणि राजकारण | प्रा.कल्पना एस.गोडघाटे | 65 |
| 17 | सशक्त लोकशाही - पक्षिय निवडणूक व सुशासन | डॉ.ओमप्रकाश सा.बोबडे | 70 |
| 18 | नागपूर जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांच्या कार्य प्रणालीचे चिकीत्सक अध्ययन | डॉ. सचिन सुरेश महल्ले | 75 |
| 19 | सहकार क्षेत्रातील महिला राजकीय नेतृत्वाची भूमिका-अहमदनगर जिल्हयातील एक अभ्यास | आगळे वैशाली रघुनाथ | 78 |
| 20 | एका अस्वस्थ मनाची वेदना : कार्यकर्ता | प्रा. हेमंतकुमार विठ्ठलराव बागडे | 82 |
| 21 | वृद्धाश्रमातील वृद्धांची भावनिक व मानसिक स्थिती - एक अध्ययन | कु. भारती रा. भडके | 84 |
| 22 | हवामान बदलाचा कृषीवर होणारा प्रभाव | डॉ.मनोज गाथे | 88 |
| 23 | भारतातील कूपोषणाची समस्या | प्रा. डॉ. सौ. अनिता एन. सोनुले | 92 |
| 24 | वैश्विक तापमान वाढ आणि त्यामुळे होणारे परिणाम | प्रा. एन. जी. सोनुले | 95 |
| 25 | भारतीय महिला आंदोलने व कौटुंबिक हिंसाचार | डॉ. सुनिल एन. साकुरे / प्रा. किशोर ना. वाहाणे | 98 |
| 26 | सुरक्षीत भविष्यासाठी आयुर्विमा | प्रा. संजय यु. उल्हे | 104 |
| 27 | गोदिंया जिल्ह्यातील भुमी उपयोजन एक भौगोलिक अध्ययन | कु. चेतना वझाडे, प्रा.डॉ.दिगांबर पारधी | 108 |
| 28 | अमरावती जिल्ह्यातील शेती कामगारांच्या संख्येत झालेल्या बदलांचा शेतीवर झालेला परिणाम एक भौगोलिक अध्ययन २००१-२०११ | प्रा. शशिकांत पी. दुपारे | 113 |
| 29 | वर्णव्यवस्थेविषयीचा ऐतिहासिक दृष्टीकोण | प्रा. डॉ. कुसमेंद्र गं. सोनटक्के | 116 |





Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
November 2018

# महानुभवांचे लीळाचरित्र व अन्य चरित्रग्रंथ

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभागप्रमुख श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर

लीळाचरित्र :

लीळाचरित्र हा मराठी वाङ्मयातील पहिला चरित्रग्रंथ होय आणि त्याचे लेखक म्हाईंभट हे आद्य मराठी चरित्रकार होत.

नागदेवाचार्य उपाख्य भटोबास हे सतत कशाचे तरी चिंतन करीत असायचे. एकदा म्हाइंभटांनी त्यांना याबद्दल विचारले. तेव्हा आचार्य म्हणाले की मी स्वामींच्या लीळा आठवत असतो. कारण स्वामींनीच मला सांगितले होते की, हे ही एक स्मरणच आहे. त्यावर म्हाइंभट म्हणाले की, तुम्हाला श्री चक्रधर स्वामींचा सहवास झाला होता. पण ज्यांचा सहवास घडला नाही त्यांचे काय? म्हणून त्यांच्याकरिता तुम्ही लीळा सांगा. मी त्या लिहून काढतो. ही लीळाचरित्राच्या लेखनामागची प्रेरणा आहे.

भटोबासांनी अनुकुलता दर्शवली आणि म्हाइंभटांनी लेखन सुरू केले. वास्तविक म्हाइंभट हा सराळे येथील एक गर्भश्रीमंत ब्राम्हण होता. तेलंगणात जाऊन तो विद्याभ्यास करून आला. त्याला आपल्या विद्वत्तेचा अति गर्व होता. तो श्री चक्रधरांची भेट घ्यायला डोमेग्रामला आला. स्वामींच्या निरूपणाने तो इतका प्रभावित झाला की त्याचे पूर्णत: गर्वहरण झाले. त्यानंतर तो स्वगृही परतला खरा पण त्याचे मन श्री चक्रधरांपाशीच गुंतून होते. तिथून तो रिद्धपूरला गेला आणि त्याने गोविंद प्रभूकडून महानुभावपंथाची दीक्षा घेतली आणि तेथेच तो गोविंदप्रभूंच्या सेवेत मग्न झाला. आपली संपत्तीही त्याने गुरुसेवेप्रित्यर्थ लावली आणि राजमठाभोवतालचा परिसर खरेदी केला. त्यांनी श्रीचक्रधर आणि श्रीगोविंदप्रभू यांची आमरण सेवा केली. दोघांच्याही लीळा लिहिण्याचे कार्य पूर्णत्वाला नेले. या कार्याविषयी त्याला आत्यंतिक तळमळ होती. ज्यांना ज्यांना स्वामींचा सहवास घडला आहे त्यांच्या त्यांच्याकडे जाऊन त्याने लीळा संकलित केल्या. या कामासाठी तो एकदा खेइंभट नावाच्या स्वामींच्या भक्ताकडे गेला होता. खेइंभट शेतावर काम करीत होता. खेइंभटाच्या मागे मागे हिंडून त्याने त्याच्याकडून आठवणी गोळा केल्या. त्याचप्रमाणे तो पैठणला सारंगभटाकडे गेला असताना सारंगभटांनी त्याला जेवणाचे आमंत्रण दिले. तेव्हा म्हाइंभटांनी त्यांना 'स्वामींच्या लीळा सांगत असाल तर मी आमंत्रण स्वीकारतो'' अशी अट घातली आणि लीळा मिळवल्या. अशा कष्टाने म्हाइंभटाने लीळांचे संकलन केले.

'लीळाचरित्रा'विषयी डॉ. शं.गो. तुळपुळे म्हणतात, ''लीळाचरित्र हा ग्रंथ एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध याप्रमाणे तीन भागात विभागलेला असून एकांक लीळा ७४, पूर्वार्ध लीळा ३५८ व उत्तरार्ध लीळा ४८८ आहे. म्हणजे संपूर्ण लीळासंख्या सुमारे साडे नऊशे आहे.'' त्याखाली दिलेल्या टिपेत ते म्हणतात, ''वास्तविक एकांक हा स्वतंत्र भाग नसून श्रीचक्रधर चरित्राच्याच पूर्वार्धाचा तो अविभाज्य भाग आहे.''

डॉ.वि.भि. कोलते यांनीही 'एकांक हा स्वतंत्र भाग नव्हे' या मथळ्याखाली म्हटले आहे, ''एकांक हा लीळाचरित्राचा स्वतंत्र विभाग नाही. पूर्वार्धाचेच ते अविभाज्य अंग आहे. पूर्वार्धाच्या भागात 'प्रतिष्ठान' येथील लीळांना (बाईसाच्या भेटीपासून) आरंभ होण्यापूर्वी 'एवं एकांक' असे लिहिलेले असते, हे खरे आहे. पण ते केवळ स्वामींचा एकाकी काळ संपला हे सांगण्याच्या दृष्टीने,



Scanned with OKEN Scanner

'लीळाचरित्राचा एक भाग संपला' हे निर्दिष्ट करण्यासाठी नाही.''२ डॉ. कोलते यांनी संपादिलेल्या पूर्वार्धात ५९२ व उत्तरार्धात ६४५ म्हणजे एकूण ११२९ लीळा आहेत. प्रा. नागपुरे संपादित लीळाचरित्रात पूर्वार्धात ५१९ व उत्तरार्धात ६१० लीळा आहेत. लीळासंख्येच्या दृष्टीने डॉ. कोलते, डॉ. तुळपुळे व प्रा. नागपुरे यांच्यात एकवाक्यता नाही.

पूर्वार्धाचा प्रारंभ श्रीचक्रधरांनी पैठण येथे आल्यावर नागांबिकेला केलेल्या प्रेमदानाने होतो. पूर्वार्धाचा शेवट खडकुली येथे नागदेवांना केलेल्या बोधदानाने होतो. येथून श्रीचक्रधरांच्या उत्तरार्धाची सुरुवात होते आणि श्रीचक्रधरांच्या प्रयाणकाळी उत्तरार्ध संपतो. याशिवाय 'अज्ञातलीळा' हेही एक प्रकरण आहे. त्यात स्वामींनी ती ती लीळा कोठे केली याचा स्थान निर्देश नसल्यामुळे त्यांना 'अज्ञातलीळा' म्हणतात. या लीळांची संख्या डॉ. कोलते संपादित लीळाचरित्रात १५४ व प्रा. नागपुरे संपादित लीळाचरित्रात १३२ इतकी आहे. लीळाचरित्राचे स्वरूप हे असे आहे.

म्हाइंभटांनी लीळाचरित्र लिहून पूर्ण केल्यानंतर लवकरच दक्षिणेवर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या. खालसैयाच्या धाडीत चक्रधरांच्या अनुयायांची पळापळ झाली. त्या गडबडीत लीळाचरित्राची पोथी कुठेतरी हरवली. यामुळे महानुभाव पंथीयांना त्यांनी घोकलेल्या लीळांच्या आधारे या ग्रंथाचे संशोधन करणे भाग पडले. हिराइसे हिला संपूर्ण लीळाचरित्र मुखोद्गत होते. तिच्या मदतीने परशुरामबासांनी हा ग्रंथ पुन्हा लिहून काढला. हिराइसाप्रमाणे इतरही काही भक्तांना लीळाचरित्र पाठ होते. परशुरामबासांनी त्यांचीही मदत घेतली व चरित्रग्रंथ सिद्ध केला. तोच त्यांचा पिढीपाठ होय. हा पाठ महानुभावपंथ प्रमाण मानतो. पण इतरही शिवबास, नागनाथ प्रभृतींनाही मूळ लीळाचरित्र पाठ होते. त्यातून पाठभेद निर्माण झाले.

लीळाचरित्र अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ आहे. तो मराठी भाषेतील पहिला चरित्रग्रंथ आहे. त्यात श्रीचक्रधरांचे संपूर्ण चरित्र आठवणींच्या रूपाने आलेले आहे. त्या आठवणी घरगुती गद्यात असल्यामुळे भाषा साधी, सोपी, सरळ व रसाळ आहे. सर्वसामान्य व्यवहारात बोलल्या जाणाऱ्या मराठीत हा ग्रंथ असल्यामुळे महाराष्ट्रातील तत्कालीन जीवनाचे प्रतिबिंब त्यात उमटलेले आहे. त्यावरून त्या वेळचा समाज, त्यांच्या चालीरिती, सणवार, व्रतवैकल्ये, वस्त्रेप्रावरणे, खाणेपिणे, नाणी, व्यापार इ. विविध अंगांचे दर्शन घडते. श्रीचक्रधरांसोबतच नागदेव, बाइसे, साधे, ज्ञानोपाध्ये, सारंगपंडित अशा अनेकांची स्वभावचित्रेही यात आली आहेत. त्यामुळे स्वामींच्या भक्तांची ती चित्रशाळाच बनली आहे. पुढील सर्व महानुभावीय वाङ्मयाचे बीज या ग्रंथात आहे. एका भव्योदात्त विषयाला तितकाच जाणता, साक्षेपी, कष्टाळू, प्रामणिक, भावनिष्ठ, शैलीकार, रसिक व चोखंदळ रसिक लाभल्यामुळे चरित्र अधिकच सुरस व रोचक झाले आहे. डॉ. कोलते म्हणतात त्याप्रमाणे, ''लीळाचरित्र हा स्मरणभक्तीचा एक अतीव सुंदर असा आविष्कार असून त्याला मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात तोड नाही.''

**श्रीगोविंदप्रभु—चरित्र**

हा ही चरित्रग्रंथ म्हाइंभटांनीच लिहिला आहे. ह्या दुसऱ्या ग्रंथाचे नाव वास्तविक 'ऋद्धिपूर—चरित्र' किंवा 'ऋद्धिपूर—लीळा' असे आहे. पण आता त्याचे नाव 'श्रीगोविंदप्रभु—चरित्र' असेच रूढ झाले आहे. गोविंदप्रभूंच्या निर्वाणानंतर सहा महिन्यांनी म्हाइंभटांनी त्यांचे हे चरित्र भटोबासांना व इतर भक्तांना विचारून लिहिले आहे. यात ३४० लीळा संग्रहित आहेत. गोविंदप्रभू ईश्वरी अवतार होते, तसेच ते 'दवडण्या'चा अवतार असल्यामुळे मुळच्या पुरुषाप्रमाणे वेडेपिसेही होते. म्हाइंभटांनी गोविंदप्रभूचे हे दोन्ही गुण अचूकपणे टिपले आहेत.



Scanned with OKEN Scanner

गोविंदप्रभूंचे मूळ नाव 'गुंडम' असे होते. पंचकृष्णाच्या नामावळीत ''जैसे ऋद्धिपुरी श्री गुंडम राऊळ' असा त्यांच्या नावाचा उल्लेख आहे. गोविंदप्रभुंचे सर्व आयुष्य वऱ्हाडप्रांतातील ऋद्धपूर येथे गेले. त्यामुळे या चरित्रातील भाषेची नव्हाळी काही वेगळीच आहे. यात वऱ्हाडातील शब्दसंपत्ती, वाक्प्रचार व म्हणी, व्याकरण विशेष हे सारे नव्हाळीचे वाटते. गोविंदप्रभू—चरित्राची भाषाशैली स्पष्ट करताना डॉ. कोलते म्हणतात, ''दैनंदिन व्यवहारात आपल्या भावना व विचार यथार्थ रीतीने आविष्कृत करणे हे गद्याचे प्रयोजन होय. हा आविष्कार जितका स्वाभाविक आणि म्हणूनच साधा, सरळ व सुबोध असेल, तितका तो परिणामकारक होतो. त्याला अलंकारादी प्रसाधनांची फारशी गरजच नसते. साधेपणा हेच त्यातील सौंदर्य होय.''

श्रीकृष्ण चरित्र :

श्रीकृष्ण चरित्राचे १) पिढीपाठ २) तळेगावकर पाठ ३) वाइं देशकर पाठ असे तीन पाठ आहे. पिढीपाठाचे लेखक म्हाइंभटच असण्याची बरीच शक्यता आहे. तळेगावकर आणि वाइं देशकर हे त्यांचे वृद्धिकार किंवा वाढावा करणारे होत.

श्रीकृष्ण चरित्राच्या निर्मितीचे कारण असे की एक दिवस महदाइसाने श्रीचक्रधरप्रभूंना विचारले, ''जी: जी: श्रीकृष्ण अवतारू कैसा अवतरला?'' त्यावर 'श्रीकृष्ण अवतारू तो गर्भीचा' असे सांगून त्यांनी तिला श्रीकृष्णाबद्दल जी माहिती दिली तिचेच संकलन करून श्रीकृष्ण चरित्र निर्माण झाले. ''यातील श्रीकृष्णाच्या सर्व लीळा केवळ श्रीचक्रधरस्वामींनीच सांगितलेल्या आहेत. दुसऱ्या कुणाचा हात लागलेला नाही. त्यामुळे या चरित्राला एकसंधपणा आलेला आहे. यात श्रीकृष्णाचे परमेश्वरी रूप व मानवी रूप यांचा मनोहर मिलाफ होऊन त्यात मोहक जिव्हाळा निर्माण झाला आहे.

स्मृतिस्थळ :

हा चरित्रग्रंथ मालेतील चौथा व अखेरचा ग्रंथ आहे. 'वृद्धाचार' व 'मार्गरूढी' हे चरित्रग्रंथ नसून ती चरित्रात्मक स्फूट प्रकरणे आहेत. 'स्मृतीस्थळ' म्हणजे नागदेवाचार्यांनी श्रीचक्रधरांची वचने ऐकून सांगितलेल्या आचारधर्माचा ग्रंथ होय.

'स्मृतीस्थळ' हा ग्रंथ कोणी व केव्हा लिहिला याबद्दल मतभेद आहेत. वा.ना. देशपांडे म्हणतात, ''सध्याचे स्मृतीस्थळ कुणाही एका लेखकाचे नसून त्यात अनेकांच्या पाठातील कमी अधिक मजकूर मिसळून गेला असावा.''३ हा निष्कर्ष अभ्यासांती ग्राह्य वाटत असला तरी अशी अनेक कारणे आहेत की ज्यामुळे कवी नरेंद्रला मूळ लेखक मानण्यास हरकत नाही असा अभिप्राय डॉ. तुळपुळे यांनी नोंदविला आहे.

महानुभाव चरित्रग्रंथांची सर्व वैशिष्ट्ये 'स्मृतीस्थळा'ला लागू पडतात. स्मृतीस्थळ— वाचून भटोबास केवढ्य थोर योग्यतेचे पुरुष होते याची चांगली कल्पना येते. शेवटी 'स्वामिकार्य पुढे चालवताना माझ्याकडून कोणती आगळीक झाली असेल तर त्यांनी मला क्षमा करावी' हे त्यांचे उद्गार एकनिष्ठ गुरुभक्तीचे कधी न पुसले जाणारे आपल्या मनावर गडदपणे उमटतात.

या चरित्रात नरेंद्र, भास्करभट्ट, केसोबास, दामोदरपंडित यांच्याशीही आपली भेट होते. तत्कालीन सामाजिक परिस्थिती, राजकीय धुमश्चक्री महाराष्ट्र संस्कृती यांचाही परिचय होतो. शिवाय भटोबास व त्यांच्या परिवाराची भ्रमंती संपूर्ण महाराष्ट्रभर असल्याने भौगोलिकदृष्ट्यही या ग्रंथाला एक वेगळेच महत्व आहे. एकूणच ''यादवकाळचे सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक,

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue : Samiksha
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
November 2018

भौगोलिक व सांस्कृतिक प्रतिबिंब या ग्रंथात पाहावयास मिळते, म्हणून या ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.''४

एकूण महानुभावांचे चारित्रग्रंथ महाराष्ट्र शारदेचे रत्नजडित अलंकार आहेत.

संदर्भ टिपा :

१. डॉ. शं.गो. तुळपुळे – महानुभाव पंथ आणि त्याचे वाड,मय , व्हीनस प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती, २००४ १४७
२. डॉ. वि.भि. कोलते (संपा.) लीळाचरित्र , म.रा. साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई, १९७८ पृ. ६२
३. वा.ना. देशपांडे (संपा.) स्मृतिस्थळ ,व्हीनस प्रकाशन पुणे, सातवी आवृत्ती २००७ पृ. १०
४. डॉ. रमेश आवलगावकर – स्मृतिस्थळ , चंद्रकला प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती २०१५ पृ. २६


RESEARCH JOURNEY

Scanned with OKEN Scanner

# COSMOS IMPACT FACTOR

Search Journal | Search

HOME | INDEXED JOURNAL | SUGGEST JOURNAL | REQUEST IF | DOWNLOAD LOGO | REVIEWER PANEL



**Category**

- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US

SAMPLE CERTIFICATE

SAMPLE EVALUATION SHEET

## Journal Detail

| | |
|---|---|
| Journal Name | RESEARCH JOURNEY |
| ISSN/EISSN | 2348-7143 |
| Country | IN |
| Frequency | Quarterly |
| Journal Discipline | General Science |
| Year of First Publication | 2014 |
| Web Site | www.researchjourney.net |
| Editor | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| Indexed | Yes |
| Email | researchjourney2014@gmail.com |
| Phone No. | +91 7709752380 |
| Cosmos Impact Factor | **2015 : 3.452** |

GIF GLOBAL IMPACT FACTOR

Institute for Information Resources

News Updates: Now Annual membership fee is of just 40 Dollars for existing members and they can renew their membership for year 2016



**Get Involved**

- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

**Recently Added Journals**

| Research Journey | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjourney.net |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

TOGETHER WE REACH THE GOAL



**SJIF Evaluation on Request**

The Editorial Staff who decide to use of the option will receive the SJIF Impact Factor within 7 days.

**SJIF Publishers Panel**

**Register journal - (Free Service)**

**Manage journal - (Free Service)**

**SJIF Journal Rank**

**Logo**

**Certificate**

**Evaluation methodology**

**FAQ**

### Research Journey

**SJIF 2016:**

Under evaluation

Previous evaluation SJIF

2015: Not indexed

2014: 3.009

2013: Not indexed

2012: Not indexed

**The journal is indexed in:**

**Basic information**

| | |
|---|---|
| Main title | Research Journey |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Licence | Free for educational use |
| Texts availability | Free |

**Contact Details**